Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF – 28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व अधिविभागातील, अधिविभागप्रमुख व विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठातील न्यायालयीन प्रकरणांबाबत सविस्तर चर्चा करण्याकरीता आस्थापना विभागाचे उपकुलसचिव, सहा. कुलसचिव तसेच विद्यापीठाचे कायदा अधिकारी यांची मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील विद्यापीठाचे कायदा सल्लागार यांचे समवेत मुंबई येथे चर्चा/बैठक आयोजित केली होती.

या अनुषंगाने विद्यापीठाचे कायदा सल्लागार यांनी विद्यापीठ कार्यालयातील न्यायालयीन प्रकरणांबाबत खालीलप्रमाणे सूचना दिल्या. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सबब, या अनुषंगाने सर्व संबंधित विभागाच्या अधीक्षक, सहा. कुलसचिव व उपकुलसचिव यांनी व्यक्तीशः लक्ष घालून त्याप्रमाणे कार्यवाहीबाबत कळविणे संयुक्तीक होईल. या बाबी खालीलप्रमाणे –

1. ज्या–ज्या वेळी मा. उच्च न्यायालय येथील न्यायालयीन प्रकरणांबाबत कार्यालयाकडून सर्व कागदपत्रे व टिपण्या/माहिती पाठविण्यात येते, त्यामध्ये केवळ विद्यापीठ व संबंधित पार्टीबरोबर झालेल्या पत्रव्यवहाराचा घटनाक्रम नमूद असतो. तथापि, विद्यापीठाने केलेली कार्यवाही (University's Action) व त्यावरील विद्यापीठाचे म्हणणे (University's Say) याबाबत संक्षिप्त स्वरुपात टिपण्या येणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने माहिती न आल्यामुळे केवळ कागदपत्रे व घटनाक्रमामधून न्यायालयीन प्रकरणातील स्पष्ट, सविस्तर व अचूक माहिती मिळणे कठीण होते. विद्यापीठाचे कायदा सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार येथून पुढे सर्व विभागांनी न्यायालयीन प्रकरणाची माहिती देत असताना Writ Petition च्या अनुषंगाने पॅरावाईज रिमार्क्स विभागाकडून अपेक्षित आहेत. त्यामध्ये विभागाकडून झालेली कार्यवाही, त्यास कारणमीमांसा व संबंधित आवश्यक कागदपत्रे सादर केल्यास न्यायालयात अचूक माहिती व विद्यापीठाचे म्हणणे सादर करता येईल, असे सांगितले.
2. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, 1994 मधील तरतूदीच्या अनुषंगाने विविध प्रकरणात विद्यापीठ अधिकार मंडळामार्फत निर्णय प्रक्रिया राबविली जाते. सदर निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयात दाद मागण्यात येवून न्यायालयीन प्रकरण दाखल केले जाते. तेंव्हा, यासंदर्भात विद्यापीठाचे कायदा सल्लागार यांनी असे स्पष्ट केले की, अधिकार मंडळाशी निगडित असणाऱ्या निर्णयाशी संबंधित बाबीमध्ये संबंधित अधिकार मंडळाने जर काही

प्रकरणामध्ये मंजूरी दिली नसली किंवा पुढील कार्यवाही करण्याबाबत समर्थन/शिफारशी नसतील तर अशा प्रकरणांच्या बाबतीत या निर्णयाबाबत संबंधित अधिकार मंडळाने शिफारशी किंवा ठरावामध्ये स्पष्ट कारणमीमांसा (Reasoning) नमूद करणे आवश्यक राहील. ज्यायोगे मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरणांबाबत विद्यापीठाचे म्हणणे सादर करीत असताना सदर कारणमीमांसा (Reasoning) नमूद करता येईल. तेंव्हा, अधिकार मंडळाचे येथून पुढचे निर्णय किंवा शिफारशी या कारणमीमांसासह येणे आवश्यक राहील. याबाबत विभागप्रमुख व त्या पुढील वरिष्ठ अधिकारी यांनी व्यक्तीशः लक्ष घालून अशा प्रकरणांबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

आदेशावरुन,

प्रभारी कुलसचिव

जा.क्र. – आस्थापना/कायदा/3984

दिनांक – 27 OCT 2016

प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
4. स्वीय सहाय्यक – मा. कुलगुरू, कुलसचिव, संचालक बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी.
5. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक INTRANET वर Registrar Circulars या सदरात प्रसिध्द करावे.
6. जनसंपर्क कार्यालयास माहितीसाठी.

**टिप :– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**